—: प्रेसनोट दिनांक – १८/०५/२०२६ :—

**आरोपी लोकसेवक अमितकुमार जगन्नाथ पाडळकर , वय – ४४ वर्षे, व्यवसाय – नोकरी पद – मंडळ अधिकारी, नृसिंहवाडी ता. शिरोळ अति.कार्यभार नांदणी ता.शिरोळ जि.कोल्हापूर रा. फ्लॅट नं.९०२, इंदिरानंद ग्रीन अपार्टमेंट, राजेंद्रनगर,कोल्हापूर २) शिवाजी आनंदराव जाधव वय ६१ वर्षे, खाजगी इसम उमेदवार रा. जाधव मळा, धरणगुत्ती, ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत...**

---

यातील मुळ तक्रारदार सचिन काडगे यांचे व त्यांचे भाउबंधामध्ये वडीलोपार्जित कोडिग्रे गावातील गट नं.७४ ते ८० ,१०९,११२ मधील न्यायालयामध्ये झालेल्या तडजोड हुकुमनाम्याप्रमाणे सदर मिळकतीचे ७/१२ उता–यास नांवे नमुद करून देण्यासाठी मंडळ अधिकारी अमितकुमार पाडळकर व त्यांचे कार्यालयामध्ये काम करणारे शिवाजी जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे १,२५,००० रू. द्यावे लागतील असे म्हणुन, तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचेकडे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, मुळ तक्रारदार यांचे न्यायालयातील तडजोडीचे हुकुमनाम्याप्रमाणे काम करून ७/१२ उता–यास नांव लावून देण्यासाठी, मंडळ अधिकारी पाडळकर यांनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता, तसेच शिवाजी जाधव यांनी स्वत:चे व मंडळ अधिकारी पाडळकर यांचे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ६०,००० रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, मंडळ अधिकारी पाडळकर यांचे सांगणेवरून त्यांनी व खाजगी इसम उमेदवार शिवाजी जाधव यांनी मागणी केलेप्रमाणे ६०,०००/– रूपये स्विकारलेने,त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत **आरोपी लोकसेवक अमितकुमार पाडळकर,मंडळ अधिकारी नृसिंहवाडी अति.कार्य.नांदणी ता.शिरोळ व खाजगी इसम –उमेदवार शिवाजी जाधव रा.धरणगुत्ती ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांचेविरूध्द शिरोळ पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक ला.प्र. वि.कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र सानप, पोलीस निरीक्षक, स.पो.फौ.प्रकाश भंडारे, पो.नो.सचिन पाटील, पो.कॉ.कृष्णा पाटील, पो.कॉ.संदिप पवार, चा.सफौ.गजानन कुराडे, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :– १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :– ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक – ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:– १०६४.